महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

दुरध्वनी क्र. : २६४७ ४२११ विस्तारित ३६४२ दूरभाष क्र. : ०२२-२६५८ १५१६.
२रा माळा, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : promahagenco@gmail.com / aphale.mahesh@gmail.com

संदर्भ : मा.सं./जनसंपर्क/प्रेस नोट/६०

## भुसावळ प्रकल्प (२ x ५०० मेगावॅट) येथे चिमनी फ्लू केनचा भाग कोसळला

महानिर्मितीच्या भुसावळ विस्तारित प्रकल्प येथे ५०० मेगावॅटचे दोन संच (संच क्र. ४ आणि ५) यांचे उभारणीचे काम सुरु आहे. दि. २८/०७/२०१० रोजी रात्री ९.४५ वा. सदर प्रकल्पातील संच क्र. ५ येथे मेसर्स. गॅमन इंडिया प्रा. लि. (मेसर्स. टाटा प्रोजेक्ट लि., हैद्राबाद यांचे कंत्राटदार) यांचेतर्फे चिमणी फ्लू केनचे काम सुमारे १२० मीटर उंचीवर सुरु असताना त्याचा काही भाग कोसळून ५ मजूर चिमनीत अडकले गेले होते. त्यापैकी ४ मजूरांची रातोरात युध्दपातळीवर सुटका करण्यात येऊन त्यांना सुखरूपणे बाहेर काढण्यात आले. त्यांची नांवे इक्बाल खान, मुनावर खान, मेहेर खान व सोनारीक राम अशी आहेत. सदर जखमींना त्वरीत वैद्यकीय उपचारासाठी जळगांव येथील ट्रामा सेंटर इस्पितळात दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर यापैकी ३ जखमींना ताबडतोब डिस्चार्ज देण्यात आला व एका जखमीवर अद्याप उपचार सुरु असून तो वैद्यकीय देखरेखीखाली आहे. तथापि, लट्टूसिंग (गडवा, झारखंड येथील रहिवासी) हा मेसर्स. गॅमन इंडिया प्रा. लि. चा एक मजूर अद्याप ढिगाऱ्याखाली अडकलेला असण्याची शक्यता असून त्याच्या सुटकेसाठी प्रकल्पस्थळी महानिर्मिती, मेसर्स. गॅमन इंडिया प्रा. लि. व मेसर्स. टाटा प्रोजेक्ट लि. यांचेतर्फे युध्दपातळीवर काम सुरु आहे. प्रतिकूल परिस्थितीत विंचच्या माध्यमातून तसेच १६० मीटरपासून ते १२० मीटर या उंचीपर्यंत तात्पुरती शिडी उभारुन हे प्रयत्न सुरु आहेत.

सदर प्रकल्पातील मुख्य संयंत्र उभारणीचे काम मेसर्स. भारत हेवी इलेक्ट्रिकल्स यांना दि. २३/०१/२००७ रोजी देण्यात आले होते. तसेच इतर पूरक संयंत्र उभारणीचे काम (बॅलन्स ऑफ प्लान्ट), मेसर्स. टाटा प्रोजेक्ट लिमिटेड, हैद्राबाद या कंपनीला दि. ०५/११/२००७ रोजी देण्यात आले होते. मेसर्स. टाटा प्रोजेक्ट लिमिटेडने सदर प्रकल्पासाठी चिमनी व कुलींग टॉवर उभारणीचे काम मेसर्स. गॅमन इंडिया प्रा. लि. यांना दिले होते. सदर फ्लू केन उभारणी व अपघाताने कोसळलेल्या भागाची दुरुस्ती स्वखर्चाने व युध्दपातळीवर करण्यात येईल, असे संबंधित कंत्राटदार यांनी कळविले आहे. तसेच अपघातग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत देण्यात येईल, असे संबंधित कंत्राटदाराने कळविले आहे.

सदर दुर्दैवी घटनेबाबत संचालक स्तरावर सखोल चौकशी करण्याचे महानिर्मितीने निश्चित केले आहे. सदर चौकशीत दोषी आढळणाऱ्या कंत्राटदारावर कडक कारवाई करण्यात येईल.

संच क्र. ४ चे क्रियान्वयन दि. २२/०३/२०११ तसेच संच क्र. ५ चे क्रियान्वयन दि. २२/०५/२०११ रोजी नियोजित असून सदर अपघातामुळे प्रकल्पपूर्तीला विलंब टाळण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतील.

---

दिनांक : २९/०७/२०१०.

प्रति,
**माननीय संपादक,**
दैनिक

आदरणीय महोदय,

कृपया सदर बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकाच्या सर्व आवृत्तीत तातडीने प्रसिध्द करावी, ही नम्र विनंती.

धन्यवादासह,

आपला स्नेहांकित,

**जनसंपर्क अधिकारी**